संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# दळभद्री राजकारण आणि शेतकऱ्याचे कर्जबाजारीपण

राजकारणाच्या वावटळीत शब्दांचे खेळ खेळणे खूप सोपे असते. भारतातल्या लोकशाहीची व्याख्या करताना असाच काहीसा शब्दांचा खेळ होतो. लोकांनी लोकांसाठी लोकांमार्फत चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही अशी त्याची मांडणी केली जाते. म्हणजे कोणी कोणासाठी काय करायचे याचा कोणताच थांगपत्ता लागत नाही. ही लोकशाही ज्यांच्या भरोशावर राबवायची असते, त्यांना ना या व्याख्येशी काही देणेघेणे, ना त्यांना लोकशाहीच्या भवितव्याविषयी फारशी चिंता असते. शब्दांचे बुडबुडे आणि भाषांचे फुगे सोडून आश्वासनांची खैरात केली जाते.कारण शब्दाला जागले पाहिजे. याविषयी हल्ली विश्वास राहिलेला नाही. म्हणजे शब्दाला जागणे हा प्रकार शिल्लक नाही. आणि जगणाऱ्यांसाठी केवळ शब्दाशिवाय दुसरे काही नाही, असे सध्या वातावरण आहे. देशभरात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय गाजतो आहे, तर महाराष्ट्रात शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली पाहिजे म्हणून विरोधी पक्षांनी गदारोळ माजवला आहे. या सगळ्यावर एक वेगळीच शाब्दिक करामत करण्याचा प्रयोग सत्ताधारी भाजपा-शिवसेनेने केला. आणि सभागृहात भाषण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्याला कर्जमाफी देण्याऐवजी त्याला कर्जमुक्ती दिली पाहिजे, असा शाब्दिक खेळ केला. कर्जमाफीच्याऐवजी कर्जमुक्ती हा शब्द वापरून शेतकऱ्याला कायमचे कर्जमुक्त करणे यासाठी सरकारचे प्रयत्न आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. कर्जमाफी असो किंवा कर्जमुक्ती असो त्यामध्ये दोन्हीकडे कर्ज हा शब्द सामायिक आहे. आणि तोच सध्या शेतकऱ्यासाठी गळ्याचा फास ठरला आहे. गळ्याशी आवळला जाणारा फास तातडीने मोकळा करणे ही आजची गरज आहे, आणि त्यासाठी मग सरकारने कोणतीही उपाययोजना केली तर ती शेतकऱ्याला हवी आहे. मग ती कर्जमाफी असेल किंवा कर्जमुक्ती असेल. एका अगदी सनातन स्वरुपाच्या दुष्टचक्रात शेतकरी सापडला आहे. आणि हे चक्रव्यूह भेदण्यासाठी त्याच ताकदीची उपाययोजना हवी आहे.

## कर्जमाफीचा पैसा जातो कुठे?

कर्जमाफीऐवजी कर्जमुक्ती द्यायचे असे जरी ठरवले तरी आज त्याच्याकडे जो पैसा नाही, तो त्याला हवा आहे. मग भलेही सावकाराचे बँकेचे कर्ज देण्याची व्यवस्था करा किंवा त्याला पुन्हा कर्ज घेण्याची वेळ येणार नाही, अशी कोणतीही व्यवस्था करा. दोन्हीचा अर्थ किंवा उपाय एकाच स्वरुपाचा ठरू शकतो. कर्जमुक्ती करण्याची व्यवस्था जर लावायची ठरवले तर मात्र त्याकरता बराच वेळ जाईल आणि तोपर्यंत आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या आणखी किती होईल, हे काही सांगता येत नाही. त्याचा अर्थ कर्जमाफी केल्यामुळे या आत्महत्या थांबतील, असेही सांगता येत नाही. आज ज्या वेगाने आत्महत्या होत आहेत किंवा एकूण हा विषय अधिकाधिक गंभीर होत आहे, हे पाहिल्यावर सरकार खरे तर एकूणच राजकारणी या संदर्भात किती संवेदनशिल आहे, एवढाच प्रश्न निर्माण होतो. जो काँग्रेस पक्ष गेली अनेक वर्षे महाराष्ट्रात सत्तेवर होता, त्याला आता अचानक शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा पुळका येण्याचे काही कारण नाही. खरे तर केंद्र आणि राज्य सरकारच्या जिथल्या दोन्ही सत्ता वर्षांनुवर्षे काँग्रेसकडे होत्या. त्यांच्या ध्येयधोरणांमुळे शेतकरी कर्जाच्या जाळ्यात अडकला. त्याला कधीच पूर्णपणे बाहेर काढले गेले नाही. त्याच्या नावाने दिल्या जाणाऱ्या कर्जमाफीच्या योजना खऱ्याखुऱ्या कर्जबाजारी शेतकऱ्यापर्यंत पोहचल्या नाहीत. उलट बागायती करणाऱ्या आणि राजकारण्यांशी साटेलोटे असलेल्या धनदांडग्या शेतकऱ्यांनी स्वतःची कर्जमाफी करून घेतली. जो अल्प भूधारक शेतकरी होता किंवा विदर्भ मराठवाडा खानदेशातला खरा कर्जबाजारी कोरडवाहू शेतकरी होता, तो या योजनांपासून कोसन कोस दूर राहिला. यूपीएच्या कार्यकाळात आणि शरद पवार कृषिमंत्री असताना ७२ हजार कोटींची कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी दिली गेली. यातले ५२ टक्के पैसे हे पश्चिम महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांसाठी वापरले गेले, तर केवळ २० टक्के पैसे हे आत्महत्याग्रस्त असलेल्या विदर्भासकट उर्वरित सगळ्या महाराष्ट्रासाठी मिळाले. यावरून कर्जमाफीसाठी मिळालेल्या पैशाचा योग्य पध्दतीने वापर होत नाही हे सिध्द होते.

## अर्थकारण करा राजकारण नको

शेतकरी हा कायम कर्जबाजारी राहणे हे तसे कोणालाच परवडणारे नाही. त्याचे कर्जबाजारीपण हे एकूण अर्थव्यवस्थेसाठीसुध्दा चुकीचे म्हटले पाहिजे. कारण शेतीला जर आपण अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग मानत असू, तर त्यामधून शेतीची आणि शेतकऱ्याची योग्य ती काळजी घेतली जाणे आवश्यक ठरते. एकीकडे कृषिप्रधान देश म्हणायचे आणि शेती ही अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे, असेही सांगायचे. पण दुसरीकडे मात्र शेतीला उद्योगाचा दर्जा द्यायचा नाही, तिच्यातल्या उत्पन्नापेक्षा नुकसानीचे जास्त भांडवल करायचे, हे योग्य ठरत नाही. शेतकऱ्यांना व्याजमाफी देऊन कर्जमुक्त करण्याचा सरकारचा इरादा असेल, तर त्यात हेतू चांगला असला तरी सरकारला हवे ते उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता कमी वाटते. मुळात तो वारंवार कर्जबाजारी का राहतो, याची चिकित्सा झाली पाहिजे. त्याचे महत्वाचे कारण असेही असू शकते की, त्याच्या मालाला योग्य तो हमीभाव मिळत नाही. निसर्गाच्या लहरीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्याला व्यापारी सरकार आणि बाजाराच्या मर्जीवर त्यावेळेला जो भाव मिळेल त्याप्रमाणे आपला माल विकावा लागतो. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर, मालाला निश्चित भाव आणि खरेदीची हमी या दोन गोष्टी जरी मिळाल्या तरी त्याच्या कर्जबाजारीपणावर काही प्रमाणात उपाय सापडू शकेल. शेतकऱ्याची कर्जमुक्ती ही त्याच्या मनातली भीती घालवूनच जाऊ शकेल. त्यासाठी मालाला योग्य किंमत आणि त्याच्या खरेदीची नुसतीच व्यवस्था गरजेची ठरते. दुर्दैवाने शेतकऱ्याच्या नावाने अभ्यासूपणे अर्थकारण होण्याऐवजी अतिशय गचाळ राजकारण होत राहिले. शेतकरी हा केवळ मतांच्या टक्केवारीसाठीच वापरला गेला. जोपर्यंत हे राजकीय दळभद्रीपण चालू आहे, तोपर्यंत त्याचे कर्जबाजारीपण कायम राहील हे सर्वांनीच लक्षात घेण्याची गरज आहे.